**अहमदनगर महानगरपालिका,अहमदनगर.**
**मा.स्थायी समिती सभा क्रंमाक-१८**
सन २००६-२००७.

विषय क्रमांक -१ दिनांक ११/२ /२००७

ठराव क्रमांक -१ दिनांक ११/२/२००७

**प्रस्तावाचा विषय :-** अहमदनगर महानगरपालिका जकात हद्दीत आयात होणा-या जकात पात्र मालावर जकात वसुली कामी दिनांक १/०४/२००७ ते दिनांक ३१/०३/२००८ अखेर एक वर्षाचे कालावधी साठी जकात ठेक्याची देकार रक्कम रूपये-४३,६१,४५,४००/-निश्चित करून जकात अभिकर्ता नेमणेकामी जाहीर निविदा मागविणेस मंजूरी मिळणे बाबत ऑफीस रिपोर्ट.

**प्रस्तावाचा मजकुर :-** विनंती रिपोर्ट की, अहमदनगर महानगरपालिका हद्दीमध्ये दि.२७/०८/२००५ पासून जकात लागु झालेली असून दिनांक २७/८/२००५ ते ३०/०९/२००५ चा कालावधी मध्ये महानगरपालिका कर्मचा-यामार्फत जकात वसुली केली आहे.

त्यानंतर दि.१/१०/२००५ ते ३०/०९/२००६ या एक वर्षाचे कालावधी साठी जकातीची वसुली करणे साठी श्री. साई एन्टरप्रायजेस उल्हासनगर यांची जकात अभिकर्ता म्हणून नेमणूक केलेली आहे. त्या वेळी जकात ठेक्याची रक्कम रूपये ४० कोटी ४१ लाख एवढी देकार रक्कम निश्चित केली होती. त्यामध्ये पारगमन पास पासून मिळणारे उत्पन्नाचा समावेश केलेला होता.

तथापि दि.१/१०/२००५ ते ३०/०९/२००६ या एक वर्षाचे कालावधी मध्ये शहरातील व्यापारी यांनी पुकारलेले जकात बंद आंदोलन व दूध व भाजीपाला या मालावर जकात माफी करावी. या मागणीच्या अनुषंगाने मा.शासनाच्या स्तरावर तसेच वित्त व नियोजन मंत्री तथा तत्कालीन पालकमंत्री अहमदनगर जिल्हा आणि मा.प्रधान सचिव नगर विकास विभाग यांचे समोर वेळोवेगळी झालेल्या बैठकी मध्ये महानगरपालिकेने जकाती संदर्भात उचित ठोस पावलेउचलण्या बाबत निर्देश देण्यांत आले होते.

त्या नुसार महानगरपालिकेने अभ्यास समिती गठीत करून अभ्यास समितीच्या अहवालानुसार मा.स्थायी समिती व महासभेसमोर निर्णय घेउन दि.२०/०२/२००६ च्या अंदाजपत्रका सोबत दर सुधारणेच्या नियमांना मंजूरी देण्यांत आली .या मंजूर नियमांना मा.शासनाने शासन निर्णय क्रमांक अ म पा १००६/ ३३२/ प्र.क्र ११२/ २००६ नवि.२४ दिनांक २०/०४/२००६ अन्वये मान्यता दिली.

सदरील नविन सुधारीत जकातीचे दर जकातीच्या ठेक्याचा कालावधी लागु करणे बाबत सहमतीचा प्रस्तावास महासभा ठराव क्रमांक-१ दि.३१/०५/२००६ अन्वये ठराव पारित करून दि.१/०६/२००६ पासून सुधारीत जकातीचे दर अंमलबजावणी मुळे येणारी जकातीची त्रुटीची रक्कम रूपये १,५५,४९,०६५/- एवढी कमी करणेस व तसेच दुध व भाजीपाल्या वरील जकात माफी मुळे येणारी त्रुटीची रक्कम वजा करणेस मान्यता देण्यांत आली होती. व त्या प्रमाणे श्री.साई एन्टरप्रायजेस, जकात अभिकर्ता यांचेशी सहमतीचा करार करणेत आला.

वरील ठरावानुसार सहमतीच्या कराराचे अनुषंगाने एकूण वार्षिक ठेक्याची रक्कम खालील प्रमाणे निश्चित करणेत आली.

| | | |
|---|---|---|
| अ | एकूण वार्षिक ठेक्याची रक्कम | ४०,४१,००,०००/- |
| ब | ४ महिन्यातील जकात दर कमी केल्या मुळे जकात रकमेत येणारी तुटीची रक्कम- | १,५५,४९,०६५/- |
| क | दुध व भाजीपाल्या वरील जकात माफी मुळे येणारी तुटीची रक्कम- | ८१,९०,०००/- |
| ड | एकूण वार्षिक तुटीची रक्कम -(ब+क) | २,३७,३९,०६५/- |
| इ | एकूण वार्षिक ठेक्याची देकार रक्कम दिनांक १/१०/२००५ ते ३०/९/२००६ अखेर (अ+ड) | ३८,०३,६०,९३५/- |

दिनांक १/१०/२००५ ते ३०/९/२००६ या एक वर्षाच्या ठेक्याचा कालावधी संपल्यानंतर मा.स्थायी समिती ठराव क्रमांक २ दिनांक २२/०८/२००६ अन्वये पुढील आर्थिक वर्षा साठी दिनांक १/१०/२००६ ते ३१/०३/२००७ या अर्ध वार्षिक वर्षा साठी सध्याचा जकात अभिकर्ता श्री.साई एन्टरप्रायझेस यांना जकात वसुलीच्या ठेक्याची मुदत वाढवून दिलेली असून सदर मुदती मध्ये जकात अभिकर्ता यांचे कडून जकाती पोटी (पारगमन व कॅन्टोन्मेट बोर्ड वर्गणी हिरस्या पैकी, जकात अभिकर्ता यांचे कडून प्राप्त करून घ्यावयाचे रक्कमेसह) रूपये १९,३५,९४,५४६/-एवढी देकार रक्कम निश्चित केली आहे.त्याचा तपशील खालीलप्रमाणे.

| | | |
|---|---|---|
| अ | दि.१/१०/२००६ ते ३१/०१/२००७ याअर्ध वर्षीय कालावधीसाठी निव्वळ जकात पोटीची देकार रक्कम | १९,२०,९४,५४६/- |
| ब | कॅन्टोन्मॅट बोर्ड (कटक मंडळ) हिस्सा वर्गणीची रक्कम रूपये १ कोटी पैकी करारानुसार जकात अभिकर्ता यांनी महानगरपालिकेला द्यावयाची रक्कम. | १५,००,०००/- |
| क | सहा महिन्या करिता एकूण देकार रक्कम | १९,३५,९४,५४६/- |

दिनांक १/१०/२००६ ते ३१/०३/२००७या सहा महिन्याचा जकात ठेक्याचा कालावधी दि.३१/०३/२००७रोजी संपुष्टात येत आहे. त्यामुळे दि.१/०४/२००७ ते ३१/०३/२००८ या एका वर्षाचे कालावधी करीता जकात वसुली करणे कामी ठेका देण्या साठी निविदा काढणे. महानगरपालिकेच्या उत्पन्नाचे दृष्टीने आर्थिक दृष्टया लाभाचे आहे. कारण खाजगी तत्वावर असलेल्या यंत्रणा म्हणजे कर्मचारी यांचे वेतन, वाहने व इतर तद्नुषंगिक खर्च, संगणीकरण, दूरध्वनी, भ्रमण ध्वनी यंत्रणा या बाबींची प्रशासना कडून परिपूर्तता होउ शकणार नाही. तसेच शहरात असणा-या जकात तस्करांचा मागिल अनुभव पाहता पूर्णपणे बिमोड प्रशासना कडून होउ शकत नाही. तसेच या कामात वांरवार हस्तक्षेत्र व अडथळे यांना पायबंद घालता येणार नाही. त्यामुळे महानगरपालिके मार्फत जकात वसुलीचे काम केल्यास ठेकेदाराकडून मिळणा-या अपेक्षीत रकमे पेक्षा कमी उत्पन्न मिळण्याची शक्यता ना कारता येत नाही. तसेच जकात वसुली ठेका पध्दतीने दिल्यास उपेक्षीत उत्पन्ना पेक्षा अधिक रक्कम मिळू शकते. महानगरपालिके कडील नाका कर्मचारी सध्या इतर विभागात वापरण्यांत येउन नागरिकांना सुविधा देणे. घरपट्टी वसुली इतर सोयीस्कर कामे देउन त्यांची सेवा उपलब्ध करून घेण्यांत येत आहे. महानगरपालिके मार्फत वसुली करावयाची झाल्यास जकात नाक्यासाठी लागणारे. महानगरपालिकेचे कर्मचारी सुमारे २५० ते ३०० लागणार आहे. जकातीचा ठेका दिल्यास सदरचे कर्मचारी इतर विभागात वापरण्यांत येईल.

त्यामुळे जकातीचा ठेका देण्यासाठी किमान देकार रक्कम खालील प्रमाणे निश्चित करण्यांत येत आहे.

| | | |
|---|---|---|
| १] | दिनांक १/१०/२००५ ते ३०/९/२००६ या कालावधी मध्ये जकात अभिकर्ता यांच्याशी सुधारीत केलेला सहमतीच्या करारानुसार देकार रक्कम रूपये ३८,०३,६०,९३५/-पैकी, दिनांक १/०४/२००६ ते ३०/९/२००६ या सहा महिन्यात प्रत्यक्ष प्राप्त रक्कम रूपये | १९,२६,१३,८०७/- |
| २] | मा.स्थायी समिती ठराव क्र.२ दि.२२/८/२००६ अन्वये जकात अभिकर्ता यांना दि.१/१०/२००६ ते ३१/०३/२००७या सहा महिन्यासाठी जकात वसुली च्या ठेक्याची मुदतवाढ दिली आहे. सदर मुदतीत जकात पोटीची निश्चित केलेली देकार रक्कम रूपये १९,३५,९४,५४६/- पैकी, माहे ऑक्टोबर २००६ते माहे नोव्हेंबर २००६ अखेर प्रत्यक्ष प्राप्त रक्कम रूपये | ६,०७,५०,२५६/- |
| ३] | दि.१/४/२००६ ते ३०/११/२००६ अखेर जकाती पोटी प्रत्यक्षात प्राप्त झालेली रक्कम (१+२) पारगमन फी सह | २५,३३,६४,०६३/- |
| ४] | उर्वरीत कालावधी म्हणजे दि.१/१२/२००६ ते ३१/०३/२००७ अखेर जकातीपोटी जमा होणारी रक्कम रूपये | १३,९४,८८,१३७/- |
| ५] | सन २००६-२००७ या एक वर्षाच्या कालावधी मध्ये जकाती पोटी प्रत्यक्ष प्राप्त रक्कम (३+४) | ३९,२८,५२,२००/- |
| ६] | सन २००७ ते २००८ एक वर्षाच्या कालवधी साठी वार्षिक ठेक्याची रक्कम ठरविण्यासाठी विचारात घ्यावयाची रक्कम (पारगमन फी सह) | ३९,२८,५२,२००/- |
| ७] | मे.शासन निर्णय क्र. जी ई एन १०९४/प्र.क्र.१४३/नवि २४ दि.३मार्च १९९५ अन्वये उक्त रकमेत शेकडा १०% ने वाढवून येणारी रक्कम | ३,९२,८५,२२०/- |
| ८] | एका वर्षा साठीची एकूण निव्वळ जकाती पोटीची अपेक्षीत रक्कम रूपये (६+७) (पारगमन फी सह) | ४३,२१,३७,४२०/- |
| ९] | कॅन्टोन्मॅट बोर्ड(कटक मंडळ)हिस्सा वर्गणीची संपूर्ण रक्कम ठेकेदार यांचे कडून वसुल करावयाची झाल्यास कराराप्रमाणे हिस्सा वर्गणीची रक्कम. | १,००,००,०००/- |
| १०] | एकूण रक्कम रूपये (८+९) | ४४,२१,३७,४२०/- |
| ११] | अहमदनगर महानगरपालिका हद्दीतील एम.आय.डी.सी तील एल व एम ब्लॉक वगळणे बाबत दिनांक १५/०१/२००७ रोजी मा.नामदार मुख्यमंत्री साहेब यांचे दालनात झालेल्या बैठकी मध्ये एल व एम ब्लॉक वगळणे बाबत निर्णय झालेला आहे. त्यामुळे सदर भागातुन प्रत्यक्ष मिळणारे उत्पन्न वजा करावे लागेल. | ५९,९२,०१२/- |
| १२] | सन २००७-२००८ या एक वर्षाचे कालावधीसाठी जकात ठेक्याची अपेक्षीत किमान देकार रक्कम रूपये<br>(पारगमन फी व कॅन्टोन्मॅट बोर्ड हिस्सा वर्गणी सह)<br>[४४,२१,३७,४२०/--५९,९२,०१२/- =४३,६१,४५,४०८/-] | ४३,६१,४५,४००/- |

तरी वरील वस्तुस्थीती विचारात घेता सन २००७-२००८ या एक वर्षाचे कालावधीसाठी जकात वसुली करणे कामी ठेका देउन जकात अभिकर्ता यांची नेमणूक करणे उचित होईल. तरी सन २००७-२००८ या एक वर्षाचे कालावधी साठी ठेक्याची किमान देकार रक्कम रूपये ४३,६१,४५,४००/-देकार रक्कम (पारगमन फी व कॅन्टोन्मेट बोर्ड हिस्सा वर्गणी सह) निश्‍चित करून त्याप्रमाणे निविदा मागविण्यासाठी मुंबई प्रांतिक अधिनियम १९४९ मधील प्रकरण ८ कराधान नियम मधील ३५ अन्वये मा.स्थायी समितीच्या मान्यतेने अभिकर्ता निश्‍चितीची तरतुद आहे.

त्यामुळे जकात वसुली साठीचा उक्त प्रस्ताव मा. स्थायी समिती कडे निर्णयास्तव पाठविणे आवश्यक आहे. तरी उचित आदेशार्थ सादर.

येणे प्रमाणे प्रभारी जकात अधिक्षक, अहमदनगर महानगरपालिका.

श्री. मच्छिंद्र डवरे यांचा अहवाल असे दि.२२/०१/२००७.

अंतर्गत लेखा परिक्षक :- प्रभारी जकात अधिक्षक यांचे कडील प्रस्ताव 'अ' प्रमाणे मान्यता देणेस हरकत नाही.

दिनांक २३/०१/२००७

मा.उपायुक्त साहेब (सा.) :- अहवालानुसार देकार रक्कम निश्‍चित करण्यासाठी प्रस्ताव मान्यते साठी मा.स्थायी समिती समोर ठेवणे हरकतीचे नाही. प्रस्ताव मान्य करतांना खालील अतिरिक्त अटी शर्ती करारात घालाव्या लागतील.

१] म.न.पा. हद्दीतुन महाराष्ट्र औध्योगिक विकास मंडळाचा **L** व **M** ब्लॉक आगामी वर्षात वगळला जाई पर्यत रूपये ५९,९२,०१२/- या रकमेचा विचार करून देय होणारी रक्कम देकार रकमे पेक्षा जास्त भरणे अभिकर्त्यावर बंधन कारक राहिल.

२] कोणत्याही प्रकारे देकार रक्कम प्राप्त झाली तर त्या अन्वये जकात अभिकर्ता नियुक्त करणे ७अथवा नाकारणे बाबत महानगरपालिका शासनाच्या मार्गदर्शनानुसार कार्यवाही करू शकेल.

३] I.T साठीच्या सवलतीचा मोबदला मक्तेदारास अनुज्ञेय असणार नाही. तरी प्रस्ताव मा.स्थायी समिती समोर ठेवणे साठी शिफारस आहे.दि.२४/०१/२००७

मा.आयुक्त साहेब :- D.M.E (Octroi)

१] १० % रक्कम वाढ ही Munimum वाढ गृहित घरावयाची आहे.

२] **L** व **M** Block Octroi सदर आकडा बरोबर आहे कां?

आजच चर्चा करावी. दि.२४/०१/२००७.

मा.उपायुक्त साहेब (कर) :- दि.२९/०१/२००७ रोजी मा.आयुक्त साहेब यांचेशी चर्चा झाली. टिपणीत नमुद मुद्यांचा खुलासा पुढील प्रमाणे.

१] म.न.पा.च्या जकात वसुली कामी पुढील वर्षाची किमान देकार रक्कम निश्‍चित करते. वेळी मागिल वर्षाच्या १०% रक्कम वाढवून निश्‍चित करणे. बाबत नगर परिषदांच्या बाबतीत शासनाचे निर्देश आहेत. सदर वाढ ही कमीत कमी १०% असावी असे निर्देश आहेत. अहमदनगर शहरातील व्यापार पहाता ही वाढ १० % एवढीच किमान देकार रक्कम निश्‍चित करणे कामी विचारात घेणे योग्य राहिल असे मत आहे.

२] अहमदनगर महानगरपालिकेच्या **L**व **M** Block मधील एक वर्षाची जकात जकात नाके निहाय डे बुक व पावती पुस्तक या वरून संकलीत केली आहे. ही रक्कम रूपये ४४,९४,००९/- इतकी असून दिनांक १/१०/२००५ ते दि.३/०१/२००६ या कालावधी मधील काही जकात नाके अस्तित्वात नसल्याने सरासरी अपेक्षीत उत्पन्न रू.१४,९८,००३/- इतके विचारात घेतलेले आहे. ही रक्कम निश्‍चित जरी नसली तरी वाजवी असल्यामुळे **L**व **M** ब्लॉक (Block) मधील विचारात घेतलेली रक्कम रू.५९,९२,०१२/- योग्य आहे असे मत आहे.

या प्रमाणे मुळ प्रस्ताव मा.स्थायी समिती पुढे मंजूरी साठी ठेवणे योग्य राहिल. मान्यतेस्तव सादर तसेच मनपासाठी मुख्य कार्यालयाची साधारण पणे २० हजार स्क्वे फुट इमारत बांधून देणा-यास निविदेत प्राधान्य देणेची अट घालणे योग्य राहिल.(इमारतीची अंदाजे बांधकाम खर्च रू.१.२५ ते १.५ कोटी) दि.२९/०१/२००७
मा.आयुक्त साहेब :- सहमती दर्शक सही. दि.२९/०१/२००६

सबब प्रकरण मा.स्थायी समिती पुढे सादर.

हा विषय वाचून दाखविला असतां त्यावर सभे मध्ये झालेली चर्चा.

मा.श्री.बारस्कर पे.ज:-ऑफीस रिपोर्ट वाचून दाखवावा. त्या प्रमाणे ऑफीस रिपोर्ट वाचून दाखविण्यांत आला.

मा.उपायुक्त साहेब (सा.) :- महानगरपालिके साठी इमारत बांधून देणारास प्राधान्य द्यावे.

मा.श्री. मुदस्सर अ.इ. :- इमारत सिमेंट कॉक्रटीची किंवा कशी.

मा.श्री.तिवारी सु.र.:-एखादा ठेकेदार सेहेचाळीस कोटी देईल.व इमारत बांधतो असे म्हणेल त्यास ठेका देणार का?

मा.उपायुक्त साहेब (सा) :- होय.

मा.श्री. त्रिपाठी सु.चं. :- एका वर्षात इमारत बांधून होईल का. ?

मा.उपायुक्त साहेब (सा.) :- जकात ठेका देउ त्याच दिवशी ठेकेदार इमारतीचे बांधकाम सुरू करू शकतो.

मा.श्री. तिवारी सु.र. :- इमारत बांधवयाची जागा सुचवावी.

मा.उपायुक्त साहेब (सा) :- बोट टाईप गेस्ट हाउस येथे इमारत बांधू शकतो. जागा उपलब्ध झाली नाही तर ठेका रूपये सव्वा कोटी ने वाढवून घ्यावा. ठेकेदार ठेका जास्त रकमे चा भरू शकतो. डी.एस.आर रेट प्रमाणे एस्टीमेट धरून सव्वा कोटीची इमारत नव्वद लाख रूपया पर्यत बांधू शकतो. जो इमारत बांधून देईल. त्यास ठेका द्यावा ठेका रक्कम व इमारतीची रक्कम यातच आलेल्या निविदांची तुलना करावयाची आहे. इमारत म्हणजे नुसल्या चार भिंती व वर छत (पत्रे) अशी इमारत बांधणे नाही.

मा.श्री. त्रिपाठी सु.चं. :- जकात ठेका चव्वेचाळीस ते पंचावन्न कोटीला जाउ शकतो तशी पस्तीस कोटीची ही बोली येउ शकते.

मा.उपायुक्त साहेब (सा) :- धुळे, मालेगांवला जकात ठेक्याची कमी बोली आली तर मा.शासनाचे मंजूरी ने तो मंजूर करणेत आला.

मा.श्री. त्रिपाठी सु.चं. :-ठेका कमी रक्कमेला गेला. तर बजेट मध्ये काट छाट होउ शकते.

मा.श्री. तिवारी सु.र. :- कमी बोली आली. तर महानगरपालिकेने स्वताः कर्मचा-यामार्फत जकात वसुली करावी.

मा.सभापती साहेब :- जकात ठेकेदाराने संगनमत करून टेंडर भरले. कुनी कमी टेंडर भरेल. ठेका रक्कम कमी आली. तर महानगरपालिका स्वताः जकात वसुली करेल अशी अट टाकावी.

मा.उपायुक्त साहेब :- कोणत्याही प्रकारे जकात वसुली देकार रक्कम प्राप्त झाली. तर जकात अभिकर्ता नियुक्त करणे. अथवा नाकारणे बाबत मा.शासनाच्या मार्गदर्शनानुसार मनपा कार्यवाही करू शकेल. निविदा मंजूरी साठी मा.स्थायी समिती समोरच येतील.

मा.श्री. त्रिपाठी सु.चं. :- स्टॅम्प डयुटीचे काय ? म.न.पा. कडून वसुल केली. जाईल असे वर्तमान पत्रात जाहिर झाले आहे.

मा.उपायुक्त साहेब (सा) :- स्टॅम्प डयुटी लागत असेल तर ती त्यांनी ठेकेदारा कडून वसुल करावी.

मा.श्री. मुदस्सर अ.इ. :- महसुल वाढविणेचे त्यांचे धोरण असेल. हा ठेकेदार जकात चुकवून आणलेल्या मालावर व्यापा-याची अडवणूक करून तडजोड करून वसुली करतो.

मा.उपायुक्त साहेब (सा) :- तडजोड करून जकात वसुली करणे त्याचे काम आहे.

मा.मुदस्सर अ.इ. :- जकात चुकविलेल्या मालावर जकात आकारते वेळी निर्णय घेण्यांचा अधिकार मा. स्थायी समितीस असेल. अशी अट टाकावी म्हणजे ठेकेदार कुणाला सवलत अगर त्रास देणार नाही. ठेकेदाराचा व्यापा-यांना त्रास होतो आहे.

प्र.जकात अधिक्षक श्री.डवरे :- जकात नियम केलेले आहेत. सदर कामी त्यात बदल करावा लागेल.

मा.श्री. तिवारी सु.र. :- पहिले ठेकेदारास ब्लॅक लीस्ट मध्ये टाकावे.

मा.श्री. त्रिपाठी सु.चं. :- ठेकेदारावर अंकुश ठेवण्यासाठी स्थायी समिती सदस्यांची कमेटी नेमावी असे ठरले होते.

मा.श्री. तिवारी सु.र. :- मा.स्थायी समितीचे सोळा सदस्यांची कमेटी नेमावी असे ठरले पण काही झाले नाही.

मा.श्री. त्रिपाठी सु.चं. :- अट टाकली तरच पूर्तता होउ शकेल.त्या बाबत कायदेविषयक सल्लागाराचे मत घ्यावे.

मा.उपायुक्त साहेब (सा) :- जकात नियमांचा कराराचा ठेकेदाराने भंग केला तर आपण कारवाई करू शकतो. त्यांची साडे तीन कोटीची बॅन्क गॅरंटी आपले कडे आहे. म.न.पा. अधिनियम १९४९ चे व अनुसुची "ड" प्रकरण आठ नियम ३५ नुसार जकात वसुलीचा अधिकार मा.आयुक्त साहेबांना आहे. ती खाजगी करणातुन अगर स्वताः वसुल करावयाची हे मा.स्थायी समितीने ठरविणे आहे.

मा.सभापती साहेब :- ठेकेदार संस्थेने महानगरपालिकाचे आर्थिक हित जोपासले नाही. त्यांचे बध्दल तक्रारी आल्यास मनपा स्वताः जकात वसुली करेल अशी अट टाकावी.

मा.श्री.त्रिपाठी सु.चं. :- जकात अटी शर्ती तसेच ठेकेदाराशी झालेल्या कराराच्या मराठी प्रती मा.स्थायी समिती सदस्यांना तीन दिवसात द्याव्यात ठेक्याचे जाहिरातीचा मसुदा स्थायी समितीला दाखवावा.

मा.उपायुक्त,साहेब(सा):-मा.स्थायी समितीला ऑफीशिअल कार्यप्रणालीत हस्तक्षेप करतां येत नाही. ठेकेदारापासून व्यापा-यांना नागरिकांना त्रास झाल्यास ठेकेदारावर अंकुश ठेवणे बाबत जकात नियम आहेत.

मा.सभापती साहेब :- एम.आय.डी.सी. मधील एम व एल ब्लॉकचे जकाती बाबत काय.

मा.उपायुक्त साहेब (सा) :- एम.आय.डी.सी मधील एल व एम ब्लॉक ची जकात रक्कम वगळून देकार रक्कम ठरविलेली आहे. ठेकेदारास मान्य असेल तर तो ठेका भरेल मान्य नसेल तर नाही.

मा.सभापती साहेब :- कार्यालयाने सुचविल्या प्रमाणे जकात ठेक्याची देकार रक्कम रू.४३,६१,४५,४००/- निश्चित करून सन २००७-२००८ चा आर्थिक वर्षा करितां जकात अभिकर्ता नेमणे कामी जाहीर निविदा मागविणेस मंजूरी देण्यांत यावी. सर्वानुमते ऑफीस रिपोर्ट मंजूर.

**ठराव :-** अहमदनगर महानगरपालिका जकात हद्दीत आयात होणा-या जकात पात्र मालावर जकात वसुली कामी दिनांक १/०४/२००७ ते दिनांक ३१/०३/२००८ अखेर एक वर्षाचे कालावधी साठी जकात ठेक्याची देकार रक्कम रूपये ४३,६१,४५,४००/- (रूपये त्रेचाळीस कोटी एकसष्ठ लाख पंचेचाळीस हजार चारशे फक्त ) निश्चित करणेस तसेच जकात अभिकर्ता नेमणे कामी जाहीर निविदा मागविणेस मंजूरी देण्यांत येत आहे.तसेच जाहीर निविदा मागवितांना अहमदनगर महानगरपालिकेचे सन २००७-२००८ या आगामी वर्षाचे अर्थ संकल्पात माहिती तंत्रज्ञानचा उद्योजकासाठी जकातीमध्ये सवलत देणे. बाबत तरतुद करण्यांत आलेली असल्याने हि सवलत अंमलात आली तर त्या बाबत कोणत्याही प्रकारची नुकसान भरपाई अनुज्ञेय असणार नाही. ही अट नमुद करावी. ऑफीस रिपोर्ट मंजूर.

नियमानुसार पुढील कार्यवाही करावी.

सुचक :- मा.श्री. तिवारी सु.र

अनुमादेक :- मा. श्री त्रिपाठी सु.चं.

ठराव सर्वानुमते मंजूर.

सभापती,<br>
स्थायी समिती,<br>
अहमदनगर महानगरपालिका.